II Impact Factor [illegible]

R. G. Patil

E-ISSN 2582-5429

# AKSHARA

## Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Vol. 4, Special Issue 02, August 2021

# Dr. Ambedkar in the Global Context



- Guest Editor -

*Dr. Mrs. M.V. Waykole*

Principal,

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

- Executive Editor -

*Dr. A. D. Goswami*

Vice Principal,

- Associate Editor -

*Prof. S. P. Zanke*

Professor & Head, Dept. of English,

Bhusawal Arts, Science &

Govt. College of Arts & Science

PRINCIPAL

Govt. College of Arts & Science

Aurangabad

Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal

Volume 4, Special Issue 2

August 2021

# *Dr. Ambedkar in the Global Context*

**Guest Editor**
**Dr. Mrs. M.V. Waykole**
Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Executive Editor**
**Dr. A. D. Goswami**
Vice Principal,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Associate Editor**
**Prof. S. P. Zanke**
Professor & Head, Dept. of English,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

*Akshara Publication*
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon (Maharashtra) 425201
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

E- ISSN 2582-5429

AMRJ

# Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

SJIF Impact-5.54

Dr. Ambedkar in the Global Context    Vol. 4, Special Issue 02, August 2021


| Sr.No | Title of the Paper & Author's Name | Pg.No |
|---|---|---|
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार- डॉ. एम. एफ. राऊतराहे | 101 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार-प्रा. डॉ. संजय व्ही. भामरे | 105 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार-प्रा. डॉ. डी. एम. टेकाडे / प्रा.डॉ. यु. एस. पाटील | 109 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार-प्रा. डॉ. रविंद्र पिरन नगराळे | 112 |
| 29 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण- प्रा.डॉ.कांबळे डी.आर. | 115 |
| 30 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक अष्टपैलू व्यक्तिमत्व-डॉ. डी. एम. कदम | 118 |
| 31 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक विचारधारा : साहित्य विषयक विचार- प्रा. सुनिल भालेराव पाटील | 123 |
| 32 | खानदेशातील स्त्रियांची आंबेडकरी चळवळ- प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे/अहिरे | 126 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्वसमावेशक विचार प्रणाली-प्रा.डॉ.बी.एस.गायकवाड | 132 |
| 34 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा चळवळीतील दलितेतर सहकाऱ्यावर पडलेला प्रभाव –एक अभ्यास<br>प्रा.रसाळ दशरथ किसन / प्रा.डॉ.विष्णू बब्रुवान वाघमारे | 137 |
| 35 | मार्क्सवादाबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार-प्रा. डॉ.वृशाली फुके | 141 |
| 36 | बहिष्कृत भारत च्या अग्रलेखातून प्रतित होणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर-<br>प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील | 144 |
| 37 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलधोरण-प्रा. रमेश शंकर माने | 149 |
| 38 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार -प्रा.डॉ.हिरालाल सोमा पाटील | 153 |
| 39 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्य व समते संबंधीचे विचार -डॉ.पी.एस .लोखंडे | 157 |
| 40 | डॉ. आंबेडकर यांच्या भाषणातून त्यांच्या चळवळीत सहभागी महिलांचे प्रबोधन-<br>प्रा. यशवंत किसन शिरसाठ | 159 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार-डॉ. दिपाली चंद्रकांत पांडे | 162 |
| 42 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही संकल्पना-प्रा. डॉ. कोनेरू बाबन्नाडूम्मलवाड | 165 |
| 43 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री-सक्षमीकरणामधील योगदान-प्रा. अरूण वसंत अवसरमल | 169 |
| 44 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषि अर्थशास्त्रातील योगदान-डॉ. जयश्री सरोदे- प्रा.शुभम सुरवाडे | 175 |
| 45 | डॉ.आंबेडकरांचे सामाजिक आणि आर्थिक विचार- प्रा.डॉ. दत्तात्रयएम. टेकाडे | 181 |
| 46 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार ( महिलां संदर्भात )-प्रा.के.जे.अनपट | 183 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मानव अधिकाराबाबत भूमिका व कार्य : एक ऐतिहासिक चिकित्सा<br>–विकास गवई | 187 |


## हिंदी विभाग


| Sr.No | Title of the Paper & Author's Name | Pg.No |
|---|---|---|
| 48 | डॉ. भीमराव अम्बेडकर का चिंतन और सामाजिक न्याय : एक अनुशीलन<br>–डॉ. संतोष कुमार अहिरवार | 190 |
| 49 | अम्बेडकर विचारधारा से प्रभावित उपन्यास : छप्पर- प्रा. डॉ. राजाराम बाबुराव तायडे | 194 |
| 50 | डॉ.बाबासाहब आंबेडकर और हाशिए के समाज का साहित्य<br>- प्रा. हंसा संजय बागरे / डॉ. जिभाऊ शा. मोरे | 196 |


PRINCIPAL

Govt. College of Arts & Science

E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
*Dr. Ambedkar in the Global Context* Vol. 4, Special Issue 02, August 2021

36

# बहिष्कृत भारत च्या अग्रलेखातून प्रतित होणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील
सहा.प्राध्यापक, इतिहास
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद(महाराष्ट्र)
E-mail- ravindrapatil2211@gmail.com

Govt. College of Arts & Science Aurangabad.

---

**प्रस्तावना-**

पत्रकारितेची एक उज्वल परंपरा महाराष्ट्राला लाभलेली आहे. अनेक नामवंत राजकीय नेते आणि समाजसुधारक यांनी वृत्तपत्राद्वारे समाजातील विघातक प्रवृत्तीवर हल्ला चढवला, तसेच समाजजागृतीचे कार्य देखील त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या व्यासपीठावरून केले आहे. या पत्रकारीतेच्या परंपरेत लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, शिवरामपंत परांजपे, आचार्य अत्रे, न. चि. केळकर, नानासाहेब परुळेकर यासारखे अनेक नामवंत पत्रकार महाराष्ट्राच्या भूमीत होऊन गेले. या परंपरेत अजून एक नाव जोडणे गरजेचे आहे, ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होय

वृत्तपत्राच्या माध्यमातून आपल्या पिचलेल्या अस्पृश्य समाजात जागृती आणणे, याशिवाय हिंदू धर्माच्या सामाजिक आणि मानसिक गुलामगिरीतून बहिष्कृत समाजाला मुक्त करण्यासाठी, त्यांचे प्रबोधन करणे गरजेचे होते. या प्रबोधनासाठी व जागृतीसाठी वृत्तपत्र हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महत्त्वाचे अस्त्र वाटले.त्या अस्त्राचा वापर करण्यासाठी त्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत ही वृत्तपत्रे काढली. त्यापैकी बहिष्कृत भारत या वृत्तपत्रात अनेक सदरे प्रसिद्ध होत असत.यापैकी अग्रलेख हे एक महत्वाचं सदर होते. अग्रलेखा मध्ये बाबासाहेब आंबेडकर स्वतः आपले विचार प्रकट करत होते.

या अग्रलेखात हिंदू धर्मातील ब्राह्मण्यग्रस्तांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारे लिखाण दिसून येते. बहिष्कृत समाजाच्या समस्यावर सर्वांगीण विचार करणारे लिखाण दिसून येते. हिंदूधर्मातील अस्पृश्यतेच्या व रूढी परंपरा वर भाष्य करणारे लिखाण दिसून येते.अस्पृश्यता निवारणासाठी झालेल्या प्रयत्नांवर चर्चाकेल्याचे दिसून येते.अस्पृश्यता निवारणासाठी त्यावेळच्या इंग्रज सरकारची तसेच वरिष्ठ हिंदूची काय जबाबदारी आहे हे ते स्पष्ट करतात. अस्पृश्य समाजाच्या स्वतःच्या जबाबदारीवर सुद्धा मत प्रकट केल्याचे दिसून येते. याशिवाय विविध महत्त्वपूर्ण विषयावर देखील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले विचार अग्रलेखातून व्यक्त केले आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात बहिष्कृत भारताच्या, अग्रलेखातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या विचारांचा चिकित्सक अभ्यास केला जाणार आहे.

**उद्दिष्टे-**

1.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या बहिष्कृत भारत या वृत्तपत्राचा अभ्यास करणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारतच्या अग्रलेखामध्ये मांडलेल्या विचारांचा अभ्यास करणे.

**विषय प्रतिपादन-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत जनतेवर होत असलेल्या अन्याय अत्याचारावर उपाययोजना सुचविण्यासाठी तसेच त्यांची भविष्यात प्रगती व्हावी यासाठी वृत्तपत्रातून चर्चा व्हावी या हेतूने सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० पासून "मूकनायक" हे पाक्षिक सुरु केले होते. मात्र त्यांना पुढील काळात बॅरिस्टरीचा राहिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला जावे लागल्यामुळे, त्यांनी मूकनायकाची जबाबदारी त्यांच्या सहकारी असलेल्या श्री ज्ञानदेव घोलप यांच्यावर सोपविली. परंतु ते इंग्लंडहून परत येण्याआधीच १९२३ साली मूकनायक हे पाक्षिक बंद पडले

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
Dr. Ambedkar in the Global Context
Vol. 4, Special Issue 02, August 2021

इंग्लंड वरून परत आल्यानंतर मात्र डॉ. बाबासाहेब१९-२०मार्च १९२७ ला झालेल्या कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या पहिल्या अधिवेशनात अध्यक्ष म्हणून सहभागी झाले.या अधिवेशनानंतर मात्र त्यांना बहिष्कृतांच्या चळवळीच्या प्रचारासाठी एका वृत्तपत्राची गरज भासू लागली. तसेच मूकनायक या वृत्तपत्राच्या स्थापनेवेळी बहिष्कृतांच्या उन्नतीसाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचारावर उपाययोजना सुचविण्याची जे ध्येय त्यांनी उराशी बाळगले होते ते पुन्हा नव्याने साकारण्यासाठी, सहा वर्षांनीडॉबाबासाहेबआंबेडकरांनी०३ एप्रिल १९२७ रोजी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. बहिष्कृत भारतचा पहिला अंक हा त्याच रविवारी ०३ एप्रिल १९२७ रोजी निघाला. त्यानंतर मात्र ते दर शुक्रवारी पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होऊ लागले. बहिष्कृत भारतला मात्र आर्थिक दृष्ट्या बिकट परिस्थितीतून जावे लागले. त्यामुळे त्यांच्या अंकात अनियमितता देखील होऊ लागली होती, कारण पत्राची वार्षिक वर्गणी तीन रुपये तर अंकाची किंमत केवळ दिडआणा अशी अत्यल्प होती. यानंतर त्यांनी जनता (१९३०) आणि प्रबुद्ध भारत (१९५६) अशी वृत्तपत्रे देखील पुढील काळात सुरूकेली.बहिष्कृत भारत च्या अंकात आत्मपरिचय, अग्रलेख, प्रासंगिक विचार, विविध विषय संग्रह, आजकालचे प्रश्न, वर्तमानसार, विचारविनिमय, लोकहितवादीची पत्रे अशा विविध सदरात मांडणी केलेली दिसते .

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत या वृत्तपत्राच्या पहिल्या अंकात अग्रलेख या सदराखाली"पुनश्चः हरिओम" हा अग्रलेख प्रसिद्ध करण्यात आला होता. या अग्रलेखा मध्ये सर्वप्रथम डॉ. बाबासाहेबांनी मूकनायक या आपल्या पहिल्या वृत्तपत्रावेळीमांडलेले त्यांचेमनोगत येथे प्रसिद्ध केले . बहिष्कृतांच्या उन्नतीसाठी स्थापन केलेले मूकनायक हे वृत्तपत्र भरभराटीस येईल, हा जो त्यांनी आशावाद त्यांनीत्यामनोगतातूनव्यक्त केला होता तो संपुष्टात आल्याबद्दल तेखंत व्यक्त करतात. वृत्तपत्र का बंद पडले याची शहानिशा मात्र ते जनतेपुढे करत नाही. या अग्रलेखाच्या दुसऱ्या टप्प्यात मात्र ते भारत देश विषमतेचे माहेरघर असल्याचेसंबोधतात. हिंदू धर्मात असलेल्या विषमतेला ते निंदास्पद म्हणतात. हिंदू धर्मातील जाती-जाती मध्ये असलेली उच्च-नीचतेची भावना ही व्यक्ती कोणत्या जातीत जन्मला आहे या पायावर उभी आहे, ती मात्र त्या व्यक्तीच्या गुणावगुणांवर अवलंबून असावी असे त्यांना वाटते. स्पृश्यास्पृश्यतेच्या भावनेमुळे बहिष्कृत जाती या हिंदू समाजात असून देखील त्या समाजाबाहेर आहेत. तत्कालीन सामाजिक व्यवस्थेची ते ब्राह्मण,ब्राह्मणेतर व बहिष्कृत अशा तीन वर्गात तेविभागणी करतात. यांपैकी ब्राह्मण वर्ग हा सर्व मानव जाती कडून स्वतःची सेवा करून घेत आहे. त्याच्याकडे ज्ञानसंचयआणि धर्मशास्त्र लेखनामुळे धर्मशास्त्रातील उदात्त विचार असून देखील त्याच्या विचारात आणि आचारात मोठी विषमता असल्याचे ते नमूद करतात. या व्यवस्थेतील दुसरा वर्गब्राह्मनेतर आहे यावर धर्मशास्त्रा चा मोठा प्रभाव आहे. तो वर्ग ब्राह्मणाला भूदेव म्हणून भजत आहे. या वर्गाची सत्तावज्ञान नसल्यामुळे प्रगती खुंटली आहे. मात्र तेदारिद्र्याच्या खाईत लोटले गेले नाही, कारण त्यांच्याकडे शेती, व्यापार, नोकरी असे चरितार्थ चालवण्यासाठी साधने आहेत. परंतु यातील तिसरा वर्ग असलेला बहिष्कृत समाजाचीअज्ञान, दारिद्र्य व दुर्बलतेमुळे बिकट अवस्था झाली आहे. जोपर्यंत स्पृश्यास्पृश्यतेच्या भेदभाव या देशात केला जाईल तोपर्यंत बहिष्कृत समाज हानित्कृष्ट स्थितीमध्ये जीवन जगणार आहे. असे बाबासाहेब म्हणतात. अशा या समाजाला जागृत करण्याचे मुख्य कार्यदेखील वृत्तपत्रांमधून होत होते. इंग्रज सरकार वर देखील टीका करताना ते म्हणतात की, इंग्रजांनी काही प्रमाणात सत्ता वरिष्ठ हिंदू लोकांच्या हाती देताना बहिष्कृत वर्गाला वेगळे प्रतिनिधित्व न देतात्यांनीबहिष्कृतवर्गालात्यांच्यास्वाधीनकेलेआहे. त्यामुळे ते बहिष्कृत वर्गासाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्याची मागणी करतात, त्याशिवाय बहिष्कृत समाजाची उन्नती होणार नाही असे विचार ते प्रतिपादित करतात.

बहिष्कृत भारतचा दुसरा अंक शुक्रवार दिनांक २२ एप्रिल १९२७ रोजी प्रसिद्ध झाला. याच्या पहिल्याच पानावर "महाड येथीलधर्मसंगर व वरिष्ठहिंदूंचीजबाबदारी"हा अग्रलेख दिला आहे. याअग्रलेखातडॉ. आंबेडकर महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह नंतर ब्राम्हण्यग्रस्त जनतेने बहिष्कृत समाजाला प्रतिबंध करण्याकरिता जो दंगा केला त्याला ते धर्मसंगर असे संबोधतात. हादंगा किंवा धर्मसंगर न घडू देण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी वरिष्ठ हिंदूंनी म्हणजे हिंदू समाजाच्या नेत्यांनी किंवा स्पृश्य हिंदुनी जबाबदारीची भूमिका निभावणे गरजेचे होते, असे तेमतमांडतात. बाबासाहेबांनी हिंदू धर्मात जन्मलेल्या सर्व जातीचे हक्क हे समान आहेत हे सिद्ध करण्यासाठी महाडचा सत्याग्रह केला होता. परंतु त्यानंतर येथील वरिष्ठ हिंदूंनी

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

दंगा घडवून हे हक्क नाकारल्यामुळे बाबासाहेबांना आश्चर्यआणि दुःख वाटते. भारत देशात एकाच धर्मांचे धर्मबंधू असून देखील सामाजिक दृष्ट्या आपलाच धर्म बंधु हा खालच्या दर्जाचा आहे किंवा अस्पृश्य आहे या प्रवृत्तीचा ते निषेध करतात.

हिंदू धर्माच्या सिद्धांतानुसार किंवा तत्वानुसार सर्व माणसे ईश्वराची लेकरे किंवा रूपे आहेत. त्यामुळे कोणीही उच्च-नीच नाही. याची आठवण ते ब्राह्मण्य ग्रस्तांना करून देतात. हिंदू धर्मामध्ये तत्वज्ञान व आचार ही दोन भिन्न अंगे आहेत,असे सांगणाऱ्या ब्राह्मण्यग्रस्तांच्या दुटप्पीपणा मात्र ते येथे उघड करतात. त्यांच्यामते कोणत्याही धर्माचा आचारात्मक मार्ग हा त्या धर्माच्या तत्वज्ञानावरच अधिष्ठित असतो. या धर्मसंगराच्या वेळी मात्र वरिष्ठ हिंदूंनी न्यायाने व समतेने अस्पृश्यांना वागणूक देऊन एक नवी सुरुवात केली पाहिजे होती. परंतु या उलट त्यांनी या तळ्याची शुद्धी करून अस्पृश्यांची एक प्रकारे वंचना केली असल्याचे डॉ. आंबेडकर ठणकावून सांगतात. अस्पृश्य जनता इस्लाम धर्म स्वीकारेल असा अस्पष्ट इशारा देखील या वरिष्ठ हिंदूंना ते देतात. कारण मुसलमानाने पाणी भरण्यास धर्मभ्रष्ट होत नाही असे स्पृश्यहिंदू मानतात. हिंदू-मुसलमान लढ्यात हिंदूंना विजय मिळवायचा असेल तर त्यांनी हिंदू धर्मातील सर्व जाती पंथ यांना एकत्र आणले पाहिजे. त्यांच्या आपसातील जातिभेद व अस्पृश्यता नष्ट केल्यास ते मुसलमानांवर विजयाचे एक निश्चयात्मक कार्य घडणार आहे. असे हिंदू धर्माच्या फायद्याचे विचार देखील बाबासाहेब मांडतात.

महात्मा गांधींचे विचाराप्रमाणे अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील मोठा कलंक आहे. मात्र डॉ. आंबेडकरांचे विचाराप्रमाणे, अस्पृश्य जनतेच्या नर देहा वरील तो कलंक आहे. हा कलंक धुऊन काढण्याचे कार्य आंबेडकर स्वतः आपल्या बांधवांसह करण्याचे स्वीकारतात व हिंदू धर्माला लागलेलाहा कलंक ते त्यांच्या रक्ताने धुऊन टाकण्यास देखील तयार आहेत. त्यासाठी ते स्वतःला भाग्यवान समजतात. अस्पृश्यता संपवण्याच्या धर्मयुद्धात कोणताही रक्तपात होऊ नये असे विचार देखील ते व्यक्त करतात. मात्र ब्राम्हण्यग्रस्तामुळे रक्तपाताच्या प्रसंग आल्यास मागे हटणार नसल्याचा इशारा देखील ते देतात.

बहिष्कृत भारत चा तिसरा अंक शुक्रवार दिनांक ०६ मे १९२७ रोजी प्रसिद्ध झाला. या अंकात अग्रलेखां मध्ये महाड येथील "धर्मसंगर व इंग्रज सरकारची जबाबदारी" हा अग्रलेख देण्यात आला आहे. या अग्रलेखा मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महाड येथेस्पृश्य हिंदूंनी अस्पृश्य लोकांना विरोध करण्याकरिता जोदंगा केला तो निवारण्याची किंवा होत असल्याची शंका आल्यास त्याला प्रतिबंध करणे हे त्या काळातील इंग्रज सरकारची जबाबदारी असल्याचे ते प्रतिपादित करतात. तसेच केवळ दंगा निवारण एवढीच त्यांची जबाबदारी नसून, अस्पृश्यता निवारण करणे ही सुद्धा इंग्रज सरकारची जबाबदारी असल्याचे ती स्पष्ट करतात. इंग्रज सरकारचे डोळे उघडावे म्हणून विविध न्यायालयीन खटल्यात कोर्टाने ज्या अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा या सर्वसामान्य जनतेच्या सार्वजनिक जीवन जगण्याचा हक्क अमान्य करतात किंवा हिरावून घेतात त्या रूढी परंपरा अमान्य केल्याचे पुरावे ते ब्रिटिश सरकारसमोर ठेवतात. अस्पृश्य लोकांना सार्वजनिक रस्त्यावर फिरण्यास मनाई करणारा,स्पृश्य लोकांचा हक्क कोर्टाने तीरूढी गैरवाजवी ठरवत अमान्य केला.जोन्याय सार्वजनिक रस्त्याला लागू आहे तोच न्याय सार्वजनिक पाणवठे व मंदीरांच्या बाबतीत लागू करा अशी मागणी डॉ. बाबासाहेब करतात. डॉ.बाबासाहेब विविध खटल्यांचा आधार देत हे स्पष्ट करतात की,स्पृश्य समाजाला अस्पृश्य समाजाच्या विरुद्ध कोणतेही कायदेशीर हक्क प्राप्त झालेले नाहीत. केवळ अस्पृश्यांनी त्या बाबींचा उपभोग घेतला नाही किंवा वहिवाट नाही म्हणूनत्यांचाहक्कनष्ट होत नाही. त्यामुळे स्पृश्य समाजज्या रूढी-परंपरांना आपला हक्क मानतो ते कायदेशीर नसल्याचे डॉक्टर बाबासाहेब स्पष्ट करतात त्यामुळे या अस्पृश्यतेच्या रुढीस बेकायदेशीर ठरवण्याचीजबाबदारी ब्रिटिश सरकारचीआहे.तेव्हा कायदेशीरपणे आपले हक्क उपभोगण्याचा प्रयत्न करणाऱ्याजनतेला, बेकायदेशीरपणे विरोध करणाऱ्या व त्रास देणाऱ्या लोकांपासून, या अस्पृश्य जनतेचे संरक्षण करून त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याची जबाबदारी इंग्रज सरकारची आहे. कारण सर्वांचे हक्क अबाधित राखण्यासाठी सरकार नावाची सर्वशक्तिमान संस्था स्थापन झालेली असते. त्यामुळे सरकारने बेकायदेशीरपणे वागणाऱ्याना तसेच दंगेखोरांना कोणाची भीडभाड न बाळगता योग्य ते शासन केले पाहिजे. याच्याही पुढे जाऊन बाबासाहेब सरकारकडून अपेक्षा करतात की दंगा झाल्यावर दंगेखोरांना शिक्षा करण्यापेक्षा दंगाच होऊ नये यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्रज सरकारवर टीका करतात की ,इंग्रजसरकार हे प्रतिनिधी आधुनिक विचारांची सरकार असले तरी, धीम्या गतीने काम करते सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत कायदे मागे हटताना दिसते.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
Dr. Ambedkar in the Global Context
Vol. 4, Special Issue 02, August 2021

शिष्टाचाराच्या नावाखाली अस्पृश्य जनतेचे हक्क हिरावून घेता येणार नाही, तसेच अनिष्ठ रूढी अस्पृश्य जनतेवरलादता येणार नाही, असेही ते शिष्टाचाराने वागा असे सांगणाऱ्या अधिकाऱ्यांना ठणकावतात. तेव्हा इंग्रज अधिकाऱ्यांनी शिष्टाचार सक्तीने अमलात आणणे, हे त्यांचे काम नसून या सरकारने कायद्याप्रमाणे न्याय देणे ही त्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे शिष्टाचाराच्या नावाखाली स्पृश्य हिंदुंच्या इच्छेप्रमाणे वागण्याचा किंवा राहण्याचाभ्याडपणाचा चा सल्ला सरकारने देऊ नये, असे बाबासाहेब ठणकावून सांगतात. अस्पृश्य जनतेची स्थिती आता पूर्वीसारखी राहिलेली नसून ते सज्ञानी झाले आहेत, त्यामुळे ते आपले अभिजात हक्क प्रस्थापित करण्यास तयार आहेत,तेव्हा स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन्ही वर्गास न्यायाने आणि निपक्षपातीपणे सरकारने वागविणे गरजेचे आहे. तेव्हा सरकारने अस्पृश्य जनतेस शिष्टाचार न सांगता त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी कायदेशीर मदत करणे हे सरकारचे कर्तव्य आहे व ते त्यांनी करावे अशी विनंती डॉ.बाबासाहेब सरकारकडे करतात. आत्म संरक्षणार्थ अस्पृश्य जनतेला हातात काठ्या घेण्यास भाग पाडू नका, तेव्हा संघर्षाची ठिणगी पडण्यापूर्वी सरकारने त्यांची जबाबदारी ओळखावी असा इशारा देखील डॉ. आंबेडकर सरकारला देतात.

बहिष्कृत भारत का चौथा अंक २० मे १९२७ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. या अंकाच्या पहिल्याच पानावर ''महाड येथील धर्म संगर व अस्पृश्य वर्गाची जबाबदारी'' हा अग्रलेख देण्यात आला होता.या अग्रलेखात बाबासाहेब अस्पृश्य वर्गाच्या जबाबदारीवर परखड विचार व्यक्त करतात. हिंदू धर्मात अस्पृश्यांना अपवित्र मानले जाते, मात्र त्याची कोणतीही कारणमीमांसा दिली जात नाही. त्यामुळे अस्पृश्यता ही स्पृश्य लोकांची लहरआहे असे बाबासाहेब म्हणतात. बाबासाहेबांच्या मते स्पृश्य लोकात विचारशून्य व आचारशून्य असे दोन प्रकारचे लोक आहेत, यातील विचार शून्य लोक अंधपरंपरेमुळे अस्पृश्यता चांगले की वाईट याचा विचार करत नाही, तर आचारशून्यलोक अस्पृश्यता वाईट आहे हे मान्य करून देखील स्वतःच्या मोठेपणाच्या स्वार्थामुळे ते विचार ते आचरणात आणत नाही. त्यामुळे अस्पृश्य समाजाला आपली अस्पृश्यता घालवण्यासाठी या दोघांना जागृत करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह च्या निमित्ताने संघर्ष होऊन स्पृश्य लोकांना अस्पृश्यतेच्या रुढीचा पहिल्यांदा अनुभव आला व त्यांच्यामध्ये या रूढी विषयी कुठेतरी जागृती आली. त्यामुळे अस्पृश्यांनी महाड येथील उपक्रमा प्रमाणे अस्पृश्यतेच्या रुढीस प्रतिकार करणारे उपक्रम हाती घ्यावे, असे डॉ. आंबेडकर अस्पृश्य जनतेस सुचवितात. त्यातूनच अस्पृश्य लोकांचा प्रतिकार होणार असल्यामुळे डॉ. आंबेडकर त्याला प्रतिकार योग असे संबोधतात. या प्रतिकारयोगाशिवाय स्पृश्य लोक या अस्पृश्यतेच्या रुढीच्या बरे-वाईट पणबद्दल विचार करणार नाही. अस्पृश्य जनतेने मात्र कोणताही प्रतिकार केला नाही, तर मात्र ही अस्पृश्यता अशीच पुढे हजारो वर्ष चालू राहणार असे डॉ. आंबेडकर यांना वाटते.

स्पृश्य जातीतील विचारी लोकांनी जर विचाराप्रमाणे आचरण केले तर, अस्पृश्यता निवारण्याच्या दिशेने पुढे पाऊल टाकले जाईल. मात्र तसे होत नाही. तेव्हा जोपर्यंत अस्पृश्य विचारी हिंदूंना स्वतःच्या हिताला धक्का बसत नाही, तोवर हे विचाराप्रमाणे कधीच आचरण करणार नाहीत. तेव्हा यांना धक्का देण्यासाठी बाबासाहेब अस्पृश्य जनतेला सुचवतात की त्यांनाहिनतेची वागणूक देणाऱ्या हिंदू धर्मावर बहिष्कार घालावा व इस्लाम धर्माची दीक्षा घ्यावी. याचा परिणाम असा होईल की अस्पृश्य जनतेने जर धर्मांतर केलं तर हिंदू-मुसलमानांच्या संस्कृतीच्या वादात मुसलमानांचा विजय होईलआणि आर्यसंस्कृतीचापाडावहोईल. याउलट जर अस्पृश्य जनता हिंदू धर्मातच राहिली तर,आर्यसंस्कृती भारतात टिकणार आहे. कारण अस्पृश्यांची लोकसंख्या एवढी आहे की ती जिकडे जाईल तिकडे हे पारडं झुकणार आहे. एवढ्या मोठ्या घडामोडीचे सामर्थ्य अस्पृश्य समाजातआहे. त्यामुळे अस्पृश्यांनी हिंदू समाजावर बहिष्कार घातला तर स्पृश्य लोक ठिकाणावर येण्यास मुळीच वेळ लागणार नाही. अशा बहिष्काराच्याअस्त्राचा उपयोग अस्पृश्य जनतेने करावा असे डॉ.आंबेडकर अस्पृश्य जनतेस सुचवितात. यालाच ते बहिष्कारयोग असे संबोधतात. प्रतिकार योग आणि बहिष्कार योग ह्या कठीण कार्यासाठी डॉ. आंबेडकर अस्पृश्य जनतेला त्यांच्या पूर्वजांनी इतिहासात गाजवलेल्या पराक्रमाची आठवण देऊन या कठीण कार्यासाठी उद्युक्त करतात.

Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

E- ISSN 2582-5429
AMRJ
*Akshara Multidisciplinary Research Journal*
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impact- 5.54
*Dr. Ambedkar in the Global Context* Vol. 4, Special Issue 02, August 2021

निष्कर्ष-

०१. हिंदू धर्मातील स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भेदभावामुळे बहिष्कृत समाज निकृष्ट स्थितीमध्ये जीवन जगत असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर नमूद करतात.

०२. हिंदू धर्मातील वरिष्ठ हिंदूंनी बहिष्कृत समाजाला भेदभावाने अस्पृश्यतेची वागणूक न देता समानतेची वागणूक देऊन त्यांना त्यांचे सर्व हक्क प्रदान करणे, त्याचा उपभोग घेऊ देणे, ही वरिष्ठ हिंदू वर्गाची जबाबदारी असल्याचे बाबासाहेब सांगतात

०३.बहिष्कृत समाजाला कायदेशीर संरक्षण देणे व अस्पृश्यतेची रूढी कायदेशीर नसल्याने त्या रुढीचे निवारण करून अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्याची जबाबदारी इंग्रज सरकारची आहे असे बाबासाहेब स्पष्ट करतात

०४.अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे स्पृश्य हिंदूचे लक्ष वेधण्यासाठी प्रतिकार योग करणे अस्पृश्य जनतेची जबाबदारी आहे, तसेच हिंदू समाजाला ठिकाणावर आणण्यासाठी बहिष्कार योगातून हिंदू धर्मावर अस्पृश्य जनतेने बहिष्कार घालावा असे डॉ. आंबेडकर अस्पृश्य जनतेला सुचवितात.

संदर्भ-

1. डॉ. बी. आर. आंबेडकर (संपादक),अंक १ला,बहिष्कृतभारत,दि.०३एप्रिल१९२७
2. डॉ. बी. आर. आंबेडकर (संपादक),अंक २रा,बहिष्कृतभारत,दि.२२एप्रिल१९२७
3. डॉ. बी. आर. आंबेडकर (संपादक),अंक ३रा,बहिष्कृतभारत,दि.०६मे१९२७
4. डॉ. बी. आर. आंबेडकर (संपादक),अंक ४था,बहिष्कृतभारत,दि.२०मे१९२७
5. वसंत मून;(संपा)"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मुकनायक", शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई,१९९०
6. खंड-१९, "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि भाषणे"(डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता-१९२०ते२८),२००५
7. खंड-२०,"डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे" (डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता १९२९ ते ५६),२००५
8. पानतावणे गंगाधर;"पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर"सुगत प्रकाशन, नागपूर,१९८७
9. जाधव नरेंद्र;"प्रज्ञा महामानवाची"(डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र लेखन) ग्रंथाली प्रकाशन मुंबई,२०१३
10. निंबाळकर वामन;डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा ,प्रबोधन प्रकाशन नागपूर,२००६

■ ■ ■

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad